| | |
|---|---|
| MHND180015422025 | खटला दाखल तारीख :– २४/११/२०२५<br>पंजीकृत तारीख :– २४/११/२०२५<br>निकालाची तारीख :– ०३/०८/२०२६<br>कालावधी **००** वर्षे, **०८** महिने, **१०** दिवस |

**विद्यमान न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी (न्यायालय क्र.२) किनवट,**

**जि. नांदेड यांचे न्यायालय.**

<u>के.जी.मेंढे–पिठासीन अधिकारी</u>

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ५८२/२०२५** **नि.क्र.०९ पुढे**

**फॉम क्रमांक–अ**

| | |
|---|---|
| **फिर्यादी/अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र सरकार मार्फत,**<br>राज्य उत्पादन शुल्क किनवट,<br>ता. किनवट, जि. नांदेड. |
| **प्रतिनिधी/प्रतिनिधीत्व** | सहा.सरकारी अभियोक्ता श्री. डि. बी.सारुळे |
| **आरोपी/ बचाव पक्ष** | **ललिताबाई सुभाष चंदनवार,**<br>वय: ५४ वर्षे, व्यवसाय : मजुरी<br>रा. शिवणी ता. किनवट, जि. नांदेड |
| **प्रतिनिधी/प्रतिनिधीत्व** | वि.विधीज्ञ श्री. एन. यु. मुनेश्वर |

**फॉम क्रमांक–ब**

| | |
|---|---|
| **गुन्हयाचा दिनांक** | २६/१०/२०२५ |
| **प्रथम खबरेचा दिनांक** | २६/१०/२०२५ |
| **प्रतिकथन निश्चितीचा दिनांक** | १६/०१/२०२६ |
| **पुरावा सुरु होण्याचा दिनांक** | २३/०२/२०२६ |
| **न्यायनिर्णय राखीव ठेवल्याचा दिनांक** | निरंक |

| | |
|---|---|
| **न्यायनिर्णयाचा दिनांक** | ०३/०८/२०२६ |
| **शिक्षा दिल्याचा दिनांक, लागु असेल तर** | लागु नाही |

**फॉम क्रमांक–क**

| आरोपीचा अनु क्रमांक | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोपीत गुन्हा | निर्दोष मुक्तता किंवा सिध्ददोषी | देण्यात आलेली शिक्षा | कलम ४२८ फौ.प्र.सं. नुसार वजावट होण्यासाठी आरोपीने कारावासात भोगलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | ललिताबाई सुभाष चंदनवार | निरंक | १६/०१/२०२६ | महाराष्ट्र प्रतिबंधक कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) व (फ) | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

**फॉम क्र.ड**

**अभियाग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालय यांच्या साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोग पक्षाचे साक्षीदार**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.०१ | परमेश्वर माधव खुपसे | घटनास्थळ व जप्ती पंच |
| सा.क्र.०२ | गंगाधर रामलु गोविंदावाड | घटनास्थळ व जप्ती पंच |

**ब. बचाव पक्ष साक्षीदार**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा स्वरुप |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयाचे साक्षीदार**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालय यांनी निशांकित केलेली कागदपत्रे**

**अ. अभियोग पक्षाची कागदपत्रे**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ब. बचाव पक्षाने निशांकित केलेली कागदपत्रे**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालय**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड. विशेष साहित्य (Material Object)**

| अ.क्र. | वस्तुला दिलेले क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**न्यायनिर्णय**

(घोषित दिनांक ०३ ऑगष्ट, २०२६)

आरोपी विरुध्द महाराष्ट्र प्रतिबंधक अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) व (फ) अन्वये शिक्षापात्र अपराधासाठी प्रस्तुत खटल्यात संपरिक्षा चालविण्यात आली.

०२. अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्री. डि.बी.सारुळे व बचाव पक्षातर्फे विद्वान वकील श्री. एन. यु. मुनेश्वर यांचा युक्तीवाद ऐकुण घेण्यात आला. अभिलेखाचे व त्यावरील पुराव्याचे अवलोकन केले. आरोपी विरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपावरुन खटल्याच्या न्यायनिर्णयासाठी खालील मुद्दे न्यायालयासमक्ष उपस्थित होतात. त्यावरील निर्णय सकारण खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २६/१०/२०२५ रोजी ११.०० वाजताच्या सुमारास मौजे शिवणी ता. किनवट, जि. नांदेड येथे आरोपीने राहत्या घरी विनापरवाना बेकायदेशीररित्या एका प्लॅस्टीक कॅनमध्ये १० लिटर हातभट्टीची गावठी दारु विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगली आणि त्याद्वारे तीने महाराष्ट्र प्रतिबंधक अधिनियमचे कलम ६५(ई) अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | ..नाही.. |
| २. | उपरोक्त वेळी व ठिकाणी आरोपीने बेकायदेशीररित्या हातभट्टीची दारु तयार करण्यासाठी ८० लिटर गुळ व पाणीमिश्रीत रसायण बाळगले आणि त्याद्वारे तीने महाराष्ट्र प्रतिबंधक अधिनियमचे कलम ६५ (फ) अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | ..नाही.. |
| ३. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र.०१ व ०२ वरील निर्णय–

०३. सा.क्र.०१ परमेश्वर माधव खुपसे व सा. क्र. ०२ गंगाधर रामलु गोविंदावाड यांना अभियोगपक्षाने जप्ती पंचनाम्याचे साक्षीदार म्हणुन तपासले परंतु या दोन्ही साक्षीदारांनी अभियोगपक्षास पुरक साक्ष दिली नाही तसेच त्यांच्या समक्ष आरोपीच्या ताब्यातून कथीत

मुद्देमाल जप्त केल्याची बाब स्पष्टपणे नाकारली.

**०४**. महाराष्ट्र प्रतिबंधक कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) व (फ) नुसार शिक्षापात्र गुन्हा सिध्द होण्यासाठी आरोपीने विनापरवाना विक्री करण्याच्या उद्देशाने मादक द्रव्य दारु आणि दारु काढण्यासाठी आवश्यक रसायण बाळगले असे सिध्द होणे आवश्यक आहे. अभिलेखावरील पुराव्याच्या अवलोकनावरुन जप्ती संबंधी स्वतंत्र पंच साक्षीदारांनी अभियोगपक्षाच्या कथनास दुजोरा दिला नाही. तसेच अभियोग पक्षाने आजपर्यंत कथीत जप्त मुद्देमालाचा रासायणीक विश्लेषण अहवाल सादर केला नाही. परीणामी कथीत मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आला व तो मुद्देमाल मादक द्रव्य दारु आणि दारु काढण्याचे रसायण होते या आवश्यक घटकांच्या सिध्दतेअभावी आरोपी विरुध्द ठेवण्यात आलेले महाराष्ट्र प्रतिबंधक कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) व (फ) नुसार शिक्षापात्र अपराधाचे दोषारोप निःसंशय सिध्द होत नाही. जप्त मुद्देमाल हा नाशवंत असल्याने जागेवरच नष्ट करण्यात आला, त्यामुळे त्याबाबत आदेश नाही. सबब मी मुद्दा क्र.०१ व ०२ वरील निर्णय नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र.०३ च्या उत्तरात खालील आदेश पारीत करतो.

## <u>आदेश</u>

**१.** आरोपीला भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २७८(१) अन्वये महाराष्ट्र प्रतिबंधक अधिनियम १९४९ कलम ६५(ई) व (फ) नुसार शिक्षापात्र अपराधाच्या दोषारोपातुन निर्दोष मुक्त करण्यात येते.

**२.** आरोपीचे पुर्वीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येतात.

**३**. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८१ च्या पुर्ततेकरीता सादर केलेली जामीन बंधपत्रे पुढील सहा महिन्याच्या कालावधीसाठी कायम राहतील.

KASHINATH MENDHE
Digitally signed by KASHINATH MENDHE
Date: 2026.08.03 20:56:00 +0530

ठिकाण– किनवट
दिनांक– ०३/०८/२०२६

के.जी.मेंढे
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी किनवट
न्यायालय क्रमांक ०२

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word, as per the original Judgment.

Name of Clerk : K. V. Pawar

Court name : Court of Judicial Magistrate F. C., Kinwat.

Date : 03.08.2026

Judgment signed by the Presiding Officer on : 03.08.2026

Judgment uploaded on : 03.08.2026

****